साप्ताहिक
# गोदावरी परिवार
RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490

गोदावरी परिवार २५ वा वर्धापन दिन

सवलतीचा पोष्ट रजि. नं. JAL/120/2022-2024

* वर्ष २५ वे * अंक ५२ * सोमवार ३०/१२/२०२४ * डाक ०१/०१/२०२५ * पाने – ४ * किंमत २ रुपये
* year 25 * issue 52 * monday : 30 / 12 / 2024 * post Dt. 01/ 01 / 2025 * pages - 4 * price 2 Rs.

# मेंदूत हाड शिरलेल्या बालकावर यशस्वी शस्त्रक्रिया

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील मेंदू व मणका विकार तज्ञांचे यश

**जळगाव – दुचाकीला झालेल्या अपघातात मेंदूला जबर दुखापत होऊन जिवीताला धोका निर्माण झालेल्या बालकावर डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात तातडीने करण्यात आलेली शस्त्रक्रिया मेंदू व मणका विकार तज्ञ डॉ. विपूल राठोड यांनी यशस्वी केली आहे. दरम्यान बालकाला बालरोग विभागात दक्षतेसाठी ठेवण्यात आले.**

याबाबत माहिती अशी की, शहापूर तालुक्यातील बंबाळे येथील रोहन भिल (वय ५) हा बालक त्याच्या वडीलांसोबत दुचाकीवर जात होता. रस्त्यात त्यांच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने धडक दिली. या अपघातात रोहन भिल याने पितृछत्र गमावले. तर रोहनच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन तो बेशुध्द पडला. त्याला तातडीने डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या बालरोग विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले. याठिकाणी बालरोग तज्ञ डॉ. उमाकांत अणेकर यांनी त्याची तपासणी केली. डोक्याची गंभीर दुखापत लक्षात घेता त्याची सीटी स्कॅन तपासणी करण्यात आली. यात रोहनच्या मेंदूत हाड शिरल्याचे निदर्शनास आले. अशा परीस्थितीत तत्काळ रूग्णालयातीलच मेंदू व मणका विकार तज्ञ डॉ. विपूल राठोड यांना बोलावण्यात आले. त्यांनी सीटी स्कॅनचे रिपोर्ट पाहून तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. मेंदू व मणका विकार तज्ञ डॉ. विपूल राठोड यांनी शस्त्रक्रियेदरम्यान रोहनच्या मेंदूत शिरलेले हाड काढून त्याची व्यवस्थित रचना केली. त्यामुळे त्याच्या डोक्यात होणारा रक्तस्त्राव बंद झाला. परिणामी बालकाचे प्राण वाचले.

या शस्त्रक्रियेसाठी डॉ. अपूर्वा, डॉ. ऋषिकेश कुळकर्णी यांचे सहकार्य लाभले. बालकाची प्रकृती स्थिर होण्यासाठी त्याला डॉ. उल्हास पाटील रुग्णालयाच्या बालरोग विभागात दाखल करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतरची पुढील देखभाल बालरोगतज्ञ डॉ.उमाकांत अणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. कुशल धांडे, डॉ. ओमश्री गुडे, डॉ. चंदाराणी देगूलरकर यांनी केली. बालकाचे प्राण वाचल्यामुळे त्याच्या आईने डॉ. उल्हास पाटील रुग्णालयातील मेंदू व मणका विकार तज्ञ डॉ. विपूल राठोड यांचे आभार मानले.


रुग्णासमवेत तज्ञ डॉक्टर आणि त्यांची टीम छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र : नितीन नेवे)

# थायरॉईडवर डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात मार्गदर्शन अन् उपचार

**जळगाव – थायरॉईड ही एक मानेच्या तळाशी असलेली फुलपाखराच्या आकाराची ग्रंथी असून, ती विविध शारीरिक कार्यांचे नियमन करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. थायरॉईड ही आपले चयापचय, ऊर्जा पातळी आणि शरीराचे तापमान नियंत्रित करणारे संप्रेरक तयार करण्यासाठी जबाबदार असणारी, जणू काही आपल्या शरीरूपी ऑर्केस्ट्राचे संयोजन करणारी एक मूक संयोजक आहे. तथापि, जेव्हा हे नाजूक संतुलन विस्कळीत होते, तेव्हा यामुळे अनेक लक्षणे उद्भवू शकतात ज्यावर उपचार न केल्यास, संपूर्ण आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.**

थायरॉईड हार्मोन्स मेंदूतील न्यूरोट्रांसमीटरवर प्रभाव पाडतात. परिणामी, असंतुलन मूड स्विंग, चिंता आणि नैराश्य या



गोष्टींवर परिणाम करू शकते. वजन कमी किंवा जास्त होणे, कोरडी त्वचा, ठिसूळ नखे आणि केस गळणे हे थायरॉईडच्या अनियमित कामकाजामुळे झालेले असू शकते. केस आणि त्वचेच्या पोत आणि स्वरूपातील बदल ही सामान्य लक्षणे आहेत. थायरॉईड विकार मासिक पाळीवर परिणाम करू शकतात, ज्यामुळे अनियमितता, जास्त किंवा कमी कालावधी किंवा अमेनोरिया (मासिक पाळी न येणे) होऊ शकते.

# पक्षाघातावर डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात खात्रीशीर उपचार

**जळगाव – स्नायूंचे अचानक नियंत्रण गमावणे हे वैद्यकीयदृष्ट्या अर्धांगवायूचा झटका म्हणून ओळखले जाते. अर्धांगवायूचा झटका स्नायूंच्या हालचालींना चालना देणार्या मज्जातंतूंच्या सिग्नलमध्ये व्यत्यय आणतात, ज्यामुळे तात्पुरते किंवा कायमस्वरूपी स्थिरता येते.**

अर्धांगवायूचा झटका म्हणजे अर्धांगवायूची अचानक सुरुवात – शरीराचे काही भाग जाणूनबुजून हलवता न येणे. हल्ल्यांमुळे स्नायू कमकुवत होतात किंवा शरीराच्या भागात मोटर फंक्शनचे पूर्ण नुकसान होते. अर्धांगवायूची व्याप्ती, कालावधी आणि कारण दुखापतीचे स्थान आणि तीव्रता यावर अवलंबून असते. मज्जासंस्था. आपल्या शरीरातील नसांचे गुंतागुंतीचे जाळे मेंदूकडून स्नायूंकडे सिग्नल प्रसारित करते, ज्यामुळे हालचाली सुरू



होतात. या मज्जातंतूच्या मार्गांवर कुठेही व्यत्यय आल्याने सिग्नल ट्रान्समिशनला अडथळा येतो, ज्यामुळे स्नायूंना आकुंचन होण्यापासून रोखते. अर्धांगवायूच्या हल्ल्यांमुळे प्रभावित शरीराचे अवयव लंगडे आणि प्रतिसादहीन होतात. चिंताग्रस्त इनपुटशिवाय, स्नायू कार्य करणे थांबवतात. अर्धांगवायू फक्त एका अंगावर आघात करू शकतो किंवा शरीराच्या इतर भागात जास्त प्रमाणात पसरू शकतो.

### अशी आहेत लक्षणे

अर्धांगवायूच्या हल्ल्याचे मुख्य लक्षण म्हणजे अचानक स्नायू कमकुवत होणे आणि प्रभावित क्षेत्र हलविण्यास असमर्थता, मुंग्या येणे, जळजळ होणे, थंड होणे किंवा हातपायांमध्ये पिन आणि सुया संवेदना, तीक्ष्ण मज्जातंतू वेदना, अनैच्छिक मुरगळणे, धक्का बसणे किंवा स्नायूंना उबख येणे, हातापायांचे नियंत्रण आणि समन्वय कमी होणे, स्पर्शाची संवेदना कमी होणे, दाब कमालीचा, कंपन इ. चालण्याच्या विकृती जसे पाय ओढणे, अस्पष्ट, मंद भाषण, दृष्टी समस्या, मल किंवा मूत्र विसर्जन करण्यात अडचण अशी पक्षाघाताची लक्षणे आहेत. अशी लक्षणे आढळल्यास त्वरीत डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील वैद्यकीय तज्ञांचा सल्ला घ्यावा असे आवाहन

# डॉ.उल्हास पाटील रूग्णालयात महिनाभरात ६८ एन्जीओप्लास्टी यशस्वी

## व्हेरीकोज व्हेन्सच्याही २० रूग्णांवर मोफत उपचार

**जळगाव – येथील डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या हृदयालयात गत महिनाभरात ६८ रूग्णांवर एन्जीओप्लास्टीची शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली आहे. तसेच व्हेरीकोज व्हेन्सच्याही २० रूग्णांवर मोफत उपचार करण्यात आले आहे. हृदयालयात शस्त्रक्रिया झालेल्या प्रत्येक रूग्णांना महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.**

हृदय स्वतः एक स्नायू आहे, म्हणून त्याचे कार्य करण्यासाठी त्याला रक्ताची आवश्यकता असते. हृदयाला रक्त देणाऱ्या रक्तवाहिन्यांना कोरोनरी धमन्या म्हणतात. या धमन्या हृदयासाठी खूप महत्वाच्या आहेत. जोपर्यंत या धमन्या हृदयाला आवश्यक रक्त पाठवत राहतात



आणि त्याला ऑक्सिजन मिळत राहतो, तोपर्यंत हृदय व्यवस्थित काम करत राहतो. जेव्हा रक्त आणि ऑक्सिजन योग्य प्रकारे हृदयापर्यंत पोहोचत नाही, तेव्हा त्याचा हृदयाच्या कार्यावर परिणाम होतो. ते निष्क्रीय देखील होऊ शकते. सहसा, हृदयविकाराचा झटका आल्यास छातीत असह्य वेदना होतात.

### अशी आहे हृदयालयातील टीम

**नागरिकांच्या हृदयाची काळजी घेण्यासाठी हृदयालयात डीएम कार्डीओलॉजीस्ट म्हणून डॉ. वैभव पाटील, डॉ. हार्दिक मोरे, डॉ. बशील अन्सारी, डॉ. विवेक चौधरी अशी तज्ञांची टीम उपलब्ध असते.**



### हृदयविकाराची लक्षणे

**जेव्हा हृदयविकाराचा झटका येतो तेव्हा काही विशेष लक्षणे दिसू लागतात. सर्वप्रथम हृदयात वेदना जाणवते. डाव्या हाताला वेदना होतात. या वेदना असह्य असतात. डावा हात सुन्न होऊ लागतो. श्वास घेण्यास त्रास होतो. नाडी वेगाने हलू लागते. अस्वस्थता जाणवू लागल्याने जीव गुदमरतो.**

### डॉ. उल्हास पाटील रूग्णालय उपचारात श्रेष्ठ

हृदयविकारग्रस्त रूग्णांवर यशस्वी उपचार करण्यात डॉ. उल्हास पाटील रूग्णालय श्रेष्ठ ठरले आहे. गत महिनाभरात डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या हृदयालयात १४४ एन्जीओग्राफीच्या तपासणी करण्यात आल्या. त्यापैकी ६८ रूग्णांवर एन्जीओप्लास्टीची शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली. तात्पुरते पेसमेकर २०, कायमस्वरूपी पेसमेकर १०, आयव्ही फिल्टर १ आणि व्हेरीकोज व्हेन्सच्या २० शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे शस्त्रक्रियेसाठी दाखल झालेल्या प्रत्येक रूग्णाला महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.

## संपादकीय

# शागीर्द पोरके

जगाने त्यांना उस्ताद मानले होते. मानाच्या असंख्य पुरस्कारांनी नावाजले होते. वयाच्या सातव्या वर्षी ज्यांनी पहिला कार्यक्रम केला. त्यानंतर मागे वळून पाहिले नाही. संगीतातील अनेक दिग्गज कलाकारांना साथ केली. भारतातील कलाकारांना जगाचे आकाश खुले करून दिले. रसिकांनी गळ्यातील ताईत बनवले होते असे झाकीरभाई स्वतःला अखेरपर्यंत शागीर्द समजत राहिले.बेटा स्वतःला शागीर्द मान. उस्ताद बनण्याचा प्रयत्न करू नकोस. चांगला शागीर्द आयुष्यभर विद्यार्थी राहातो' असा संस्कार माझ्या वडिलांनी माझ्यावर केला होता. नम्रतेचा आणि शिष्यत्वाचा वारसा पित्याने आपल्याला दिला असे त्यांनी एका मुलाखतीत सांगितले होते. तालीमही तशीच दिली होती. त्यांचे वडील उस्ताद अल्लारक्खा कुरेशी यांचे ऋजू आणि प्रेमळ व्यक्तिमत्व अनेकांना आजही आठवत असेल. हाच वारसा मागे सोडून झाकीरजी अंतिम प्रवासाला निघून गेले आहेत. त्यांचा वारसा त्यांना अजरामर करून गेला आहे. तबला हे साथ वाद्य. तबलावादनाला त्यांनी स्वतंत्र अस्तित्व मिळवून दिले. स्वतःचेही प्रभावी स्थान निर्माण केले. पण मैफिलीत साथ करतांना कधीही इतर कलाकारांवर कुरघोडी केली नाही. श्रोत्यांना खिळवून ठेवण्यासाठी अधूनमधून गमतीजमती करत पण त्या तेवढ्यापुरत्याच असत. सामान्य माणसे सामान्यतः शास्त्रीय संगीत मैफिलीच्या वाटे फारसे जात नाहीत. कारण त्यातले फारसे काही कळत नाही अशी लोकांची प्रामाणिक भावना असते. तथापि झाकीरभाईंचे तबलावादन ऐकण्यासाठी हीच माणसे गर्दी करत. भरभरून दाद देत. त्यासाठी तबल्यातील काही कळण्याची गरज लोकांना वाटली नाही. इतके तबलावादन त्यांनी नावारूपाला आणले होते. घराघरात नेले होते. परिणामी मुलांनी तबला शिकावा अशी भावना असंख्य पालकांच्या मनात निर्माण झाली. मुलांना तबला शिकण्याची वाट त्यांनी खुली केली. त्यानिमित्ताने घराघरात ते सर्वांना त्यांचेच वाटत राहिले. झाकीरभाईंमुळे असंख्य तबलावादक त्यांची जागा निर्माण करू शकले. सामान्य माणसांशी जोडली गेलेली त्यांची नाळ कोणताही पुरस्कार कधीही तोडू शकला नाही. झाकीरभाईंनी तसे होऊ दिले नाही. त्यांना भेटलेल्या, त्यांना पाहिलेल्या प्रत्येक माणसाच्या ते कायम आठवणीत राहिले. यापुढेही राहातीलच. कारण त्यांनी संगीतक्षेत्रात, रसिकांच्या मनात त्यांची एक जागा निर्माण केली आहे. झाकीरभाईंच्या जाण्याने लाखो मनामनातील तबल्याचे बोल शांत झाले आहेत. असा कलाकार पुन्हा होणे नाही.

# सावदा येथे क्रीडा महोत्सव उत्साहात

## डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम सीबीएसइ स्कूल



**सावदा – येथील उल्हास पाटील इंग्लिश मीडियम सीबीएसइ स्कूल मध्ये दरवर्षीप्रमाणे क्रीडा महोत्सव उत्साहात पार पडला.**

दिनांक १७ डिसेंबर रोजी उद्घाटन प्रसंगी गोदावरी फाउंडेशनच्या सचिव मा. डॉ. वर्षा पाटील सदस्य डॉ.अनिकेत पाटील, सावदा पो.स्टे चे स.पो.नि वैभव पाटील आणि शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. भारती महाजन हे मान्यवर उपस्थित होते. प्रमुखा पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते जिज्ञासा भारंबे या गोल्ड मेडलिस्ट विद्यार्थिनीचा गौरव करण्यात आला.मार्च पास करण्यात आले व ध्वजारोहणाला सलामी दिली गेली. क्रीडा ध्वजारोहण शपथ विधिग्रहण तसेच मशाल प्रज्वलित करण्यात आली. विविध प्रकारच्या खेळांवर आधारित विद्यार्थ्यांनी नृत्य सादरीकरण केले.

त्यानंतर स.पो.नि वैभव पाटील यांनी शाळा व विद्यार्थी यांच्या बद्दल आपले मनोगत व्यक्त करतांना क्रिडा प्रकाराच्या टीप्स दिल्यात तर डॉ. अनिकेत पाटील यांनी विद्यार्थ्यांचे मनोगत व्यक्त करतांना क्रिडा प्रकारांमुळे शरीरास व्यायाम मिळतो तसेच त्यांना असलेल्या फुटबॉल खेळाची आवड आणि त्या करीता घेतलेले कष्ट विषद करीत विद्यार्थ्यांचे कौतुक केले . या वेळी मोठ्या प्रमाणावर पालकवर्ग देखीले उपस्थित होता . क्रीडा स्पर्धेची सुरुवात क्रिकेट मॅच ने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. महिला आणि पुरुष पालक देखील या क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. स्पर्धेसाठी क्रिकेट मॅच, बुद्धिबळ, कबड्डी अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते हा महोत्सव १७ ते २० डिसें पर्यंत चालणार आहे. याप्रसंगी सगळे शाळेचे विद्यार्थी शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन इयत्ता दहावीचे विद्यार्थी विद्यार्थिनी प्राची राठोड ,आर्या पाटील ,रितेश सुरवाडे, संकेत जोशी यांनी केले.

# डॉ.उल्हास पाटील इंग्लिश मिडियम सीबीएसई भुसावळात क्रीडा दिन उत्साहात



**भुसावळ – डॉ.उल्हास पाटील इंग्लिश मिडियम सी.बी.एस. ई. स्कुल भुसावळ येथे क्रीडा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहूणे संस्थाध्यक्ष माजी खा. डॉ. उल्हास पाटील, तसेच मुख्याध्यापिका सौ.अनघा पाटील आदी मान्यवर उपस्थीत होते.**

विद्यार्थ्यांनी मशाल ज्योत पेटवून कार्यक्रमाची सुरुवात केली. रेड, ब्ल्यू, , व यलो ग्रुप या चार गटात विभागणी करण्यात आली. त्यानंतर चार गटात स्पर्धा झाल्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट प्रकारे ड्रील सादर केली. सुमारे १००० विद्यार्थ्यांनी ड्रीलमध्ये सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी डीयुपीईएमस शाळेचे नाव ड्रिल करून बनवले व कवायत सादर केली. नर्सरी ते इ. १० वी पर्यंत विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या खेळामध्ये सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची वेशभूषा परिधान करून पंजाबी, आसामी, राजस्थानी, केरला, महाराष्ट्र, गुजराथी, ओडीसा, कश्मिरी गीतावर पारंपारिक नृत्य सादर करून पालकांचे व उपस्थितांचे मन मोहन टाकले. प्रसंगी बक्षिस वितरणाचा कार्यक्रम माजी खा. डॉ. उल्हास सौ. अनघा पाटील यांच्या हस्ते पार पाडला. कार्यक्रमास सर्व पालकां, शिक्षकां व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट प्रकारे कार्यक्रम सादर करून उपस्थितांचे मन मोहून टाकले.




# चोपडा येथे आरोग्य शिबीर

**चोपडा – ग्रा.प कार्यालय व डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.** या शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी १५२ नागरिकांची तपासणी तसेच यातील नेत्ररोग १०,हृदयरोग १४,बालरोग १,कान नाक घसा ५,अस्थीरोग १०, आणि सर्जरी ३ अशा ४३ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



# साखरखेर्डा येथे आरोग्य मेळा

**साखरखेर्डा – ग्रा.प कार्यालय साखरखेर्डा व डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.**

या मेळाव्यात तज्ञ डॉक्टरांनी ७४ नागरिकांची तपासणी तसेच यातील नेत्ररोग ५ ,मेडीसिन १, अस्थीरोग २, आणि सर्जरी १ अशा ९ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# दाभा, ता.मोताळा येथे आरोग्य मेळा

**दाभा, ता. मोताळा – ग्रा.प कार्यालय व डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.**

या मेळाव्यात तज्ञ डॉक्टरांनी ५२ नागरिकांची तपासणी तसेच यातील नेत्ररोग ४,हृदयरोग १ ,अस्थीरोग ३, त्वचारोग १ आणि ,कान नाक घसा २ अशा ११ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



# पल्सी झाल्शी येथे आरोग्य शिबीर

**पल्सी झाल्शी ता. सग्रामपूर – ग्रा.प कार्यालय पल्सी झाल्शी व डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

या शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी ११० नागरिकांची तपासणी तसेच यातील नेत्ररोग १५ ,मेडीसिन ६,कान नाक घसा २,अस्थीरोग ४, आणि सर्जरी ४ अशा ३१ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.






# शेदुर्णी येथे आरोग्य शिबीर

**शेदुर्णी ता. जामनेर – ग्रा.प कार्यालय शेदुर्णी व डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

या शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी ९४ नागरिकांची तपासणी तसेच हृदयरोग विभागातर्फे २२ नागरिकांचा टुडीइको करण्यात आला. यातील हृदयरोग ८,नेत्ररोग ७,मेडीसिन ५,कान नाक घसा ३,अस्थीरोग २,स्त्रीरोग २ आणि सर्जरी ४ अशा ३१ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



# फरकांडे येथे आरोग्याची मंदियाळी

**फरकांडे ता एरंडोल – ग्रा.प कार्यालय फरकांडे ता एरंडोल व डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

या शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी ८९ नागरिकांची तपासणी तसेच यातील नेत्ररोग ३ ,मेडीसिन ७, अस्थीरोग १, आणि सर्जरी २,हृदयरोग ७ स्त्रीरोग १ आणि कान नाक घसा ०३ अशा २५ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

Editor : Sourabh Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सौरभ पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पिटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात. Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# गोदावरी इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूलमध्ये एलेगेंझा २०२४ गॅदरिंगचा जल्लोष

**जळगाव– गोदावरी इंग्लिश मीडियम स्कूलच्या एलेगेंझा २०२४ म्युझिक कन्सर्ट आणि सांस्कृतिक महोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.**



या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य, संगीत, गीत गायनाने पालक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. गोदावरी इंग्लिश मीडियम स्कूलच्या एलेगेंझा २०२४ या कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी सुप्रीम इंडस्ट्रीचे महाप्रबंधक ज्ञानदेव महाडिक, मिस एशिया मृणाली चित्ते,गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष चेअरमन डॉ. उल्हास पाटील सर, सचिव डॉ वर्षा पाटील, संचालिका डॉ. केतकीताई पाटील, सदस्य डॉ. अनिकेत पाटील, कार्डिओलॉजिस्ट डॉ. वैभव पाटील, एमिए कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रशांत वारके यांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि सरस्वती पूजन करण्यात आले. यावेळी अनिल खर्चे, अलका खर्चे, भुसावळ स्कुलच्या प्राचार्या अनघा पाटील, सावदा स्कूलच्या प्राचार्या भारती महाजन ,कु. कृतिका आदी मान्यवर उपस्थित होते. स्कुलच्या प्राचार्या निलीमा चौधरी यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. सुप्रीम इंडस्ट्रीचे महाप्रंबधक ज्ञानदेव महाडिक यांनी सांगितले कि, मी खुप भाराबुन गेलो. हा माझा मोठा सन्मान समजतो मला इथे निमंत्रित केले. तुम्हि मला उपकृत केल्याचे गौरवोद्वार प्रमुख पाहुणे सुप्रीम इंडस्ट्रीचे महाप्रबंधक ज्ञानदेव महाडिक यांनी व्यक्त केले. ध्येय धरल्यास आकाशहि ठेंगणे होते असेहि महाडिक म्हणाले. यावेळी डॉ. अनिकेत पाटील यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले कि, गोदावरी शाळेला २५ वर्ष पुर्ण झाले आहे. २४ तास गोदावरी स्कुलचे शिक्षक समर्पण वृत्तीने काम करतात. गोदावरी स्कुलची प्रतिष्ठा जपण्याचे कार्य शाळेच्या प्राचार्या आणि प्रत्येक सदस्यानी प्रामाणिकपणे केले असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान म्युझिक कन्सर्टमध्ये चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याने पालकांना अचंबित केले. सांस्कृतिक कार्यक्रमांनी मिळविली दाद दुसर्या दिवशी सांस्कृतिक कार्यक्रमांचे उद्घाटन कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी, पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, गोदावरी फाउंडेशनचे सदस्य डॉ. अनिकेत पाटील, गोदावरी एमबीए कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रशांत वारके , गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय पाटील,यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. २०२२- २३ तसेच २०२३-२४ या वर्षात दहावी आणि बारावी मध्ये उच्चांक गाठलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्रे देऊन गौरवण्यात आले.सांस्कृतिक कार्यक्रमात पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कार सादर केले. या नृत्याविष्काराला पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात जोरदार दाद दिली.स्कूलच्या प्राचार्य सौ. निलीमा चौधरी यांनी आपल्या स्कूलचा वार्षिक अहवाल सादर केला.कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला. शाळेच्या व्यवस्थापनाने 'एलिगंझा' कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान दिलेल्या शिक्षक, विद्यार्थ्यांना आणि पालकांना धन्यवाद दिले. 'एलिगंझा' हा कार्यक्रम शाळेच्या वार्षिक उपक्रमांतील एक महत्त्वाचा क्षण ठरला. कार्यक्रमाच्या शेवटी स्कूलच्या प्राचार्या निलीमा चौधरी यांनी शाळेतील विविध उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयीची माहिती दिली.

# गोदावरी आयएमआरमध्ये रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरी इलाईट पदग्रहण सोहळा

**जळगाव – गोदावरी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनजमेंट अँड रिसर्च , जळगाव येथे रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरी इलाईट पदग्रहण सोहळा २०२४-२०२५ पार पडला.**



या वेळी रोट्रॅक क्लब ऑफ गोदावरी एलिटचे अध्यक्ष ओम प्रकाश सिंग,सचिव संजय तापडिया, गोदावरी इन्स्टिटयूट ऑफ मॅनजमेंट अँड रिसर्च जळगांवचे संचालक रो. डॉ. प्रशांत वारके, गोदावरी कॉलेज इंजिनीरिंग चे प्राचार्य विजयकुमार पाटील, रोट्रॅकटर मोहित शामनांनी, तसेच विध्यार्थी आणि शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. प्रशांत वारके यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली तसेच रोट्रॅक क्लब ऑफ गोदावरी एलिट चे नवीन अध्यक्ष रोट्रॅकटर भूमिका नले आणि सचिव निधी पाटील यांना वर्ष २०२४-२०२५ चा कार्यभार सोपविण्यात आला तसेच नवीन एकूण ४३ रोट्रॅक सदस्य नोंदविण्यात आले. रोट्रॅक क्लब ऑफ गोदावरी एलिटचे नूतन अध्यक्ष रोट्रॅकटर भूमिका नले हिने येणाऱ्या २०२४-२०२५ वर्षाचे कार्यक्रमाचे नियोजन सांगितले. रोट्रॅक क्लब ऑफ गोदावरी एलिटची सचिव निधी पाटील यांनी आभार मानले.

# रा.से.योजना जनजागृती सप्ताहाचा समारोप

## तरसोद गावात केली जनजागृती

**जळगाव – येथील गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग जळगाव राष्ट्रीय सेवा योजना जनजागृती सप्ताहाचा समारोप नुकताच करण्यात आला. या सप्ताहात जळगाव तालुक्यातील तर्सोद या गावात जनजागृती करण्यात आली.**



दि ९ रोजी सामाजिक सर्वेक्षण, पाणीवाचवा पथनाट्य,दि १० रोजी बीएमआर तपासणी,शालेय आरोग्य तसेच पोषण आहार पथनाटीका, दि ११ मानवाधिकार दिवस साजरा तसेच अंगणवाडीस भेट, दि १२ रोजी स्वच्छता व घरोघरी जावून आरोग्य अभियान, १३ रोजी वृक्षारोपण तसेच आरोग्य शिक्षण, दि १४ रोजी बालशोषण, घरगुती हिंसा आणि काळी जादू यावर पथनाटयाव्दारे जनजागृती करण्यात आली या सप्ताहाचा समारोप राष्ट्रगिताने करण्यात आला. गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विशाखा गणविर, प्रा. स्वाती गाडेगोणे, रा.से.योजना समन्वयक प्रा. निम्मी वर्गीस, प्रा. आश्लेषा मून, प्रा. रितेश पडघन, श्रुती गजभरे व प्राध्यापक मंडळींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. उल्हास पाटील यांनी उपक्रमाचे कौतुक केले.

# आपत्ती व्यवस्थापन काळाची गरज!

## अधिष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके यांचे प्रतिपादन

**जळगाव – आपत्ती व्यवस्थापन ही काळाची गरज असून ५ चक्राव्दारे यावर मात होवू शकते असे मत येथील गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग आयोजित समुदाय आरोग्य संकटाचे व्यवस्थापन आणि प्रतिसाद देण्यासाठी आणीबाणीची तयारी आणि प्रतिसाद प्रशिक्षण आणि प्रशिक्षकासाठी आपत्कालीन प्रशिक्षण कार्यक्रमात डॉ. प्रशांत सोळंके बोलत होते.**

पुढे बोलतांना त्यांनी आपत्ती व्यवस्थापन चक्राचे ५ टप्पे विषद करतांना योग्यरित्या अंमलात आणल्यास, आपत्ती-व्यवस्थापन चक्र




आपत्तीजनक घटनेचा प्रभाव कमी करू शकते. हे पूर्ण, जलद पुनर्प्राप्तीसाठी आवश्यक धोरणे आणि आपत्कालीन प्रतिसाद देखील समाविष्ट करू शकते. सायकलमध्ये खालील पाच टप्प्यांचा समावेश आहे १ प्रतिबंध आपत्तीचा सामना करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे सक्रिय असणे. याचा अर्थ संभाव्य धोके ओळखणे आणि त्यांचा प्रभाव कमी करण्यासाठी सुरक्षा उपाय योजणे. २. शमन यात स्ट्रक्चरल आणि नॉनस्ट्रक्चरल दोन्ही उपाय केले जाऊ शकतात. ३. तयारी ज्यामध्ये चालू प्रशिक्षण, मूल्यमापन आणि सुधारात्मक कृतींद्वारे केली जाते, तत्परतेची सर्वोच्च पातळी सुनिश्चित करते.४. प्रतिसाद यात अल्पकालीन आणि दीर्घकालीन प्रतिसादांचा समावेश आहे. ५. पुनर्प्राप्ती आपत्ती-व्यवस्थापन चक्रातील पाचवा टप्पा म्हणजे पुनर्प्राप्ती. यास बराच वेळ लागू शकतो, शेवटी, हा टप्पा आपत्तींच्या प्रभावावर अवलंबून व्यक्ती, समुदाय, व्यवसाय आणि संस्थांना सामान्य किंवा नवीन सामान्य स्थितीत परत येण्यास मदत करण्याबद्दल आहे.यावेळी प्राचार्य विशाखा गणविर, प्रा जेसिंथ ढाया,प्रा निर्भय मोहोड, प्रा. स्वाती गाडेगोणे, प्रा डिव्हायना पवार, प्रा अश्लेषा मून, प्रा रितेश पडघन, प्रा सुमित भारंबे इ मान्यवर उपस्थीत होते. सुत्रसंचालन प्रा डिव्हायना पवार यांनी तर आभार रितेश पडघन यांनी मानले.

# रोटरॅक्ट क्लब ऑफ डॉ. वर्षा पाटील वुमन्स कॉलेज इलाईटचा पदग्रहण सोहळा

**जळगाव – रोटरॅक्ट क्लब ऑफ डॉ. वर्षा पाटील वुमन्स कॉलेज इलाईटचा पदग्रहण सोहळा २०२४-२०२५ नुकताच पार पडला.**

रोटरॅक्ट क्लब ऑफ डॉ. वर्षा पाटील वुमन्स कॉलेज इलाईट तर्फे आयोजित या सोहळयाला रोट्रॅक क्लब ऑफ गोदावरी एलिट चे अध्यक्ष ओम प्रकाश सिंग तसेच सचिव संजय तापडिया, गोदावरी कॉलेज इंजिनीरिंगचे प्राचार्य विजयकुमार पाटील, डॉ वर्षा पाटील वूमेन्स कॉलेज ऑफ कॉम्पुटर ॲप्लिकेशनच्या प्राचार्य डॉ. निलीमा वारके, रोट्रॅकटर मोहित शामनांनी, तसेच विध्यार्थी आणि शिक्षकवृंद उपस्थित होते. तसेच रोट्रॅक क्लब ऑफ गोदावरी एलिट चे नवीन अध्यक्ष रोट्रॅकटर भूमिका नले आणि सचिव निधी पाटील यांना वर्ष २०२४-२०२५ चा कार्यभार सोपविण्यात आला तसेच नवीन एकूण ४३ रोट्रॅक सदस्य नोंदविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रोटेरियन ओम प्रकाश सिंग यांनी विध्यार्थ्यांना रोट्रॅक क्लब मध्ये उत्साह आणि समाजाचे आपण देणे लागतो यासाठी सतत कार्यरत होण्यासाठी प्रोत्साहित केले शेवटी रोट्रॅक क्लब ऑफ गोदावरी एलिट चे समन्वयक प्रो प्राजक्ता पाटील आणि प्रज्ञा बाविस्कर यांनी कार्यक्रमाचे आयोजन व सुत्रसंचालन केले तसेच रोट्रॅक क्लब ऑफ गोदावरी एलिटची सचिव निधी पाटील यांनी आभार मानले.



# गोदावरी नर्सिंगमध्ये २० रक्तदात्यांचे रक्तदान

**जळगाव – येथील गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाचे प्रशासन अधिकारी प्रविण कोल्हे यांच्या वाढदिवसानिमीत्त फंडामेंटल ऑफ नर्सिंग विभागातर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.**

गोदावरी नर्सिंग महाविद्यालय फंडामेंटल ऑफ नर्सिंग विभाग व डॉ उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय रक्तपेढीच्या सयुक्त विद्यमाने आयोजीत या शिबिराचे उदघाटन प्राचार्य विशाखा गणविर, प्रशासन अधिकारी प्रविण कोल्हे यांचे हस्ते केककटींगने करण्यात आले. यावेळी अध्यापनाचे प्राध्यापकांमध्ये श्री पीयूष वाघ, श्री. सुमित निर्मख, श्री.सुरज दहातोंडे, श्री.अभिजीत राठोड, श्री.शरद आडे यांनी रक्तदान केले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विदयार्थी अशा २० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

यावेळी डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालयाचे डॉ. प्रज्ञा मंडलपूरे, रक्तपेढीचे समन्वयक लक्ष्मण पाटील, सईद अहमद शेख, भावेश शेळके व गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग महाविद्यायलाचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.




# रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरी नर्सिंग एलीटचा पदग्रहण समारंभ

**जळगाव – रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरी नर्सिंग एलीटचा पदग्रहण समारंभ (आरआयडी ३०३०) चा भव्य पदग्रहण समारंभ येथील सभागृहात उत्साहात संपन्न झाला.**

यावेळी सन २०२४-२५ या वर्षासाठी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पदग्रहणाची शपथ देण्यात आली.यावेळी आर.टी.आर. मोहित शम्नानी, जिल्हा आयएसडी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी रोटरॅक्ट क्लबच्या कार्याबद्दल माहिती देत येत्या वर्षातील नियोजन विषद केले.

आर.टी.आर. भूमिका नाळे यांची अध्यक्ष म्हणून आणि आर.टी.आर. निधी पाटील यांची सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिका यांनी रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरी एलीटच्या कार्याचा सन्मान राखण्याची आणि सेवा व नेतृत्वाद्वारे समाजाला योगदान देण्याची शपथ घेतली.




कार्यक्रमात प्रा. रश्मी टेंभुर्णे आणि प्रा. सुमित निरमल हे शिक्षक सदस्य, अपूर्वा भातुरकर, आकांक्षा डोंगरे, सौंदर्या पटेल, आचल मिलके, प्रतीक्षा वर्मोडे, आणि हर्षा कुमभरे हे उत्साही विद्यार्थी सदस्य उपस्थित होते.

समारोप प्रसंगी मान्यवरांनी मार्गदर्शन करत शुभेच्छा व्यक्त केल्यात.

# मोफत सुवर्ण प्राशन संस्कार शिबिराचा १५० बालकांना लाभ

## डॉ.गुणवंतराव सरोदे आयुर्वेद मेडीकल कॉलेज,हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटरतर्फे

**जळगाव – येथील गोदावरी फॉउंडेशन संचलित डॉ.गुणवंतराव सरोदे आयुर्वेद मेडीकल कॉलेज,हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटर तर्फे पुष्यनक्षत्रावर सुवर्ण प्राशन संस्कार शिबिराचा १५० बालकांनी लाभ घेतला.**

डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय जळगाव भुसावळ महामार्ग जळगाव खुर्द येथे हा कार्यक्रम १८ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते ५ यावेळेत आयोजित करण्यात आला होता. नवजात बालकापासून १६ वर्षाची मुल-मुली आजारी पडत असतील,मुलांची शारीरीक वाढ योग्य प्रमाणात होत नसेल,मुलांचे अभ्यासात लक्ष लागत नसेल, तर यावर उपाय म्हणून डॉ.गुणवंतराव सरोदे आयुर्वेद मेडीकल कॉलेज,हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटरने दोन थेंब बाळाला द्या सुर्वणप्राशनाचे वरदान लाभेल




आरोग्य व बौध्दीक विकासाचे हे अभियान आयोजित केले होते. आयुर्वेदातील १६ संस्कारापैकी महत्वाचा असा



डॉ. प्रेमचंद पंडित
(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)
वैद्यकीय अधीक्षक
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

* Decisively lead from the front by setting clear goals and expectations.
* Make bold decisions that can be risky and keep composed when uncertainty strikes.
* Learn swiftly, adjust to change and work with ambiguity.
* Be prepared to face current challenges and equipped to harness future opportunities.
* Leverage short-term opportunities as circumstances demand it and craft new strategies accordingly.
* Implement established and tested procedures while simultaneously being open to new experimentation.
* Enhance problem-solving capacity and improve the chances of navigating challenges.

* स्पष्ट लक्ष्य और अपेक्षाएं निर्धारित करके सामने से निर्णायक रूप से नेतृत्व करें।
* साहसिक निर्णय लें जो जोखिम भरे हो सकते हैं और जब अनिश्चितता आती है तो शांत रहें।
* तेजी से सीखें, बदलाव के अनुकूल हों और अस्पष्टता के साथ काम करें।
* वर्तमान चुनौतियों का सामना करने के लिए तैयार रहें और भविष्य के अवसरों का लाभ उठाने के लिए सुसज्जित रहें।
* परिस्थितियों की मांग के अनुसार अल्पकालिक अवसरों का लाभ उठाएं और तदनुसार नई रणनीतियां तैयार करें।
* स्थापित और परीक्षण की गई प्रक्रियाओं को लागू करते हुए, साथ ही नए प्रयोग के लिए खुले रहें। समस्या-समाधान क्षमता बढ़ाएं और चुनौतियों को नेविगेट करने की संभावनाओं में सुधार करें।



# डायलेसिस आणि ऐआरटी सेंटरला नर्सिंगच्या विद्यार्थ्यांची भेट

**जळगाव – येथील गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग जळगावच्या बीएस्सी चतुर्थ सत्राच्या विदयार्थ्यांनी डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या डायलेसिस आणि ऐआरटी सेंटरला भेट देवून माहिती जाणून घेतली.** आपल्या या भेटीत ऐआरटी सेंटर येथे एच आय व्ही एडस रूग्णांसाठी उपलब्ध असलेल्या उपचार सुविधा, पध्दती तसेच सेवा प्रदान करतांना कशी काळजी घेतली पाहीजे यांची माहिती घेतली. डायलेसिस विभागात रूग्णालयाच्या रविंद्र बोरसे यांनी तर ऐआरटी सेंटर येथे डॉ.कल्पना पंडीत मेडीकल ऑफीसर यांनी माहिती दिली. यावेळी वैद्यकिय अधिक्षक डॉ. प्रेमचंद पंडीत,रूग्णालय व्यवस्थापक प्रा. एन जी चौधरी यासह गोदावरी नर्सिंगचे प्रा रितेश पडघन, प्रा सचिन पवार हे उपस्थीत होते.

गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात

# हेपेटायटिस बी लसीकरण उपक्रम

**जळगाव : गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाच्या वैद्यकीय सर्जिकल नर्सिंग विभागाच्या वतीने प्रथम वर्ष बीएससी नर्सिंगच्या विद्यार्थ्यांसाठी हेपेटायटिस बी लसीकरण उपक्रम राबविण्यात आला.**

या उपक्रमात ९६ विद्यार्थ्यांना हेपेटायटिस बी लसीकरण करण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांना हेपेटायटिस बी या गंभीर आजाराबाबत मार्गदर्शन करतांना त्याचे लक्षणे, कारणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि लसीकरणाचे महत्त्व याविषयी सखोल माहिती देवून जनजागृती करण्यात आली. आरोग्याच्या दृष्टीने अत्यावश्यक माहिती देऊन वैद्यकीय क्षेत्रात सुरक्षिततेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन वैद्यकीय-सर्जिकल नर्सिंग विभागाने केले होते. मार्गदर्शनासाठी प्रा.







सुमैया शेख, प्रा. प्रियांका गडेकर, प्रा. रोहिणी हरगे आणि प्रा. सचिन पवार यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांनी विद्यार्थ्यांना लसीकरण प्रक्रियेची ओळख करून देत, त्याचे फायदे समजावून सांगितले.महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षकवृंद आणि वैद्यकीय अधिकारी यांनी विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक काळजी घेण्याचा संदेश दिला. अशा उपक्रमांच्या माध्यमातून महाविद्यालय विद्यार्थ्यांना आरोग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने सजग बनत आहे.

# संधीवाताच्या वेदनांमुळे त्रस्त आहात?

## आजच घ्या डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील तज्ञांचा सल्ला

**जळगाव – सध्या हिवाळ्याचे दिवस सुरु आहेत. आणि या दिवसांत बहुतेकांना जाणवणारा त्रास म्हणजेच संधिवात. संधिवात हा शब्द दोन शब्दांनी जोडला गेला आहे. एक म्हणजे संधी आणि दुसरा वात. संधी म्हणजे जॉइंट.**

आपल्या शरीरामध्ये कोणत्याही प्रकारचा जॉइंट दुखत असेल सूज येत असेल तर आपण त्याला संधीवात असे म्हणू शकतो. शरीरातील एकापेक्षा जास्त सांध्यांना सूज येणं किंवा तीव्र वेदना होणं याला 'आर्थरायटीस' किंवा संधिवात म्हणतात. हा प्रामुख्याने वृद्धांना होणारा आजार आहे. वाढत्या वयासोबत हळूहळू वाढत जाणारा हा आजार मानला जातो.

संधिवाताचे असंख्य प्रकार आहेत.



अनेक प्रकारचे संधिवाताचे प्रकार काही लोकांना माहित आहेत. यामध्ये आढळणारा प्रीओलस संधिवात साधारण १५ ते १६ टक्के लोकांना आयुष्यात एकदा तरी संधिवात होऊन गेलेला आहे. प्रीओलन्स म्हणजे १०० लोकांच्या मागे १५ लोकांना आयुष्यात संधिवात झालेला आहे. जर तुम्हाला सांध्यांमध्ये त्रास जाणवला तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. संधिवात फक्त तुमच्या जॉईंट्समध्येच जात नाही तर तो संपूर्ण शरीरात पसरू शकतो. म्हणून याची विशेष काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातील वैद्यकीय तज्ञांचा सल्ला घ्यावा असे आवाहन रूग्णालय प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.



# भगवान स्वामीनारायणाच्या चरणी १५० दात्यांचे रक्तदान

**जळगाव – भगवान श्री स्वामीनारायण मंदिराच्या भव्य मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळयानिमीत्त दि १० ते १७ डिसें या सप्ताहात १५० च्या वर रक्तदात्यांनी रक्तदान करीत पुण्यकामात हातभार लावला.**

येथील दुरदर्शन टॉवर जवळील जळगाव भुसावळ रोडवरील दूरदर्शन टॉवरच्या शेजारी वडताल संस्थेच्या अंतर्गत भगवान स्वामीनारायण मंदिराची उभारणी करण्यात आलेली आहे. या मंदिरात भव्य मूर्तींची प्राणप्रतिष्ठा स्थापन करण्यासाठी या परिसरात १० ते १७ डिसेंबरच्या दरम्यान भव्य प्राणप्रतिष्ठान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते . यावेळी डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या रक्तपेढीतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन केले गेले या शिबिरास प्रचंड प्रतिसाद मिळाला असून १५० ब्लड बॅग रक्त संकलन झाले. या शिबिरासाठी संस्थेचे मान्यवर तर रक्तपेढीचे समन्वयक लक्ष्मण पाटील यांनी परिश्रम घेतले.

# नवलेखकांच्या पहिल्या पुस्तकाच्या प्रकाशनाला अनुदानासाठी अर्ज पाठवा

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून सन २०२५ या वर्षासाठी आतापर्यंत एकही पुस्तक प्रकाशित झालेले नाही, अशा नवलेखकांच्या पहिल्या पुस्तकाच्या प्रकाशनाला अनुदान देण्यासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत.

नवलेखकांनी दि. १ ते ३१ जानेवारी, २०२५ या कालावधीत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत, मुंबई येथे आपले साहित्य पाठवावेत. या योजनेसाठीचे माहितीपत्रक, विहित नमुन्यातील अर्ज आणि इतर तपशील महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर 'नवीन संदेश' या अंतर्गत नवलेखक अनुदान योजना २०२५ माहितीपत्रक व अर्ज' या शीर्षाखाली तसेच 'What's new' या अंतर्गत 'Navlekhak Grant Scheme Rules Book and - Application Form' या शीर्षकाखाली तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या http://sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी क्र. २४३२ ५९३१ यावर संपर्क साधावा. असे आवाहन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सचिव यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे.

# महसूल विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक अडचणी सोडविण्यासाठी संवाद कार्यक्रम

**जळगाव – जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या संकल्पनेतून लोकशाही दिनाच्या धर्तीवर महसुल विभागातील अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवाविषयक अडचणी सोडविण्यासाठी आज दिनांक २३/१२/२०२४ रोजी दुपारी ४ वाजता संवाद कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता.**

त्यात शासकीय सेवेत कामकाज करत असतांना अधिकारी / कर्मचारी यांच्या स्वतःच्या सेवा विषयक बाबी दुर्लक्षीत राहतात. त्यामुळे पदोन्नती, सेवानिवृत्तीचे लाभ मिळण्यास विलंब होतो. त्याअनुषंगाने अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवाविषयक अडचणी सोडविण्यासाठी दिनांक २३/१२/२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजता अल्पबचत सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय जळगाव येथे मोहिम स्वरुपात संवाद कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी आयुष प्रसाद,निवासी उपजिल्हाधिकारी, भिमराज दराडे, तहसिलदार (महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय श्रीमती ज्योती गुंजाळ हे उपस्थित होते. याबरोबर महसूल कर्मचारी संघटना/तलाठी कर्मचारी संघटना/शिपाई कर्मचारी संघटना यांचे पदाधिकारी व कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमात कर्मचा-यांच्या अडचणी ऐकून घेण्यात आल्या व आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पात्र अधिकारी/कर्मचारी यांना प्रातिनिधीक



स्वरुपात कालबध्द पदोन्नतीचे आदेश समक्ष वाटप करण्यात आले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी भिमराज दराडे यांनी प्रास्ताविक केले. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आभार प्रदर्शन नायब तहसिलदार (महसूल) अंगद आसटकर यांनी केले. असा नाविन्यपुर्ण उपक्रम जळगाव जिल्हयात प्रथमच राबविण्यात आलेला आहे.